# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

( पूर्वीचे पुणे विद्यापीठ )

## परिपत्रक

विषय: विद्यार्थी सुरक्षा विमा, विद्यार्थी कल्याण निधी, विद्यार्थी आरोग्य सेवा योजना, आपत्कालिन निधी, विद्यापीठ क्रीडा मंडळ व शारीरिक शिक्षण मंडळ निधी, नोंदणी शुल्क, संगणक शुल्क व विकास निधीतील विद्यापीठ हिस्सा ऑनलाईन पध्दतीने पाठविण्याच्या मुदतवाढीबाबत.

शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मध्ये आपल्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त संस्थेतील विविध अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे दि. **३० नोव्हेंबर, २०२३** पर्यत भरण्याबाबत विद्यापीठ परिपत्रक क्र. २४०/२०२३ दि. १८/१०/२०२३ अन्वये कळविले होते. तथापी, काही महाविद्यालय/संस्था यांनी शुल्काची रक्कम अद्यापही भरलेली नाही.

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, ज्या महाविद्यालय/संस्थानी अद्यापही विद्यार्थ्यांच्या शुल्कातील विद्यापीठाचा हिस्सा ऑनलाईन पध्दतीने चलनाद्वारे भरला नसेल त्यांना **दि. ३१ डिसेंबर, २०२३** पर्यंत भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे. ऑनलाईन प्रो–रेटा व इतर निधी संबंधी माहिती भरण्याची ऑनलाईन प्रक्रिया BOD पोर्टल अंतर्गत दिली आहे. BOD login मध्ये 'प्रो–रेटा ऑनलाईन' ही लिंक वापरून सदरची माहिती भरण्यात यावी.

उपकुलसचिव
**शैक्षणिक प्रवेश**

गणेशखिंड, पुणे – ४११००७
संदर्भ : शै. प्रवेश/४६३४
दिनांक : २९/११/२०२३

प्रति,
मा. प्राचार्य, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये.
मा. संचालक, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्न असेलेल्या सर्व मान्यताप्राप्त परिसंस्था.
प्रत :
मा. वित्त व लेखा अधिकारी, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, विद्यार्थी विकास, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, क्रिडा व शारिरीक शिक्षण, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे
मा. संचालक, राष्ट्रीय सेवा योजना, सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

E:\Pro-Rata Circular 2023-24

Scanned by CamScanner